


दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ६ । अंक १९ । मंगळवार ६ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## ओडिशातून पुण्याला जाणारा ७६ लाखांचा गांजा जप्त

### स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेची संगमनेरजवळ कारवाई

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** ओडिशा राज्यातून नाशिकमार्गे पुण्याच्या दिशेने टाटा नेक्सॉन कारमधून होणारी मोठ्या प्रमाणातील गांजाची तस्करी स्थानिक गुन्हे शाखा आणि संगमनेर शहर पोलिसांनी संयुक्त कारवाई करत उधळून लावली. नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील सायखिंडी फाटा (ता. संगमनेर) येथे रचलेल्या सापळ्यात पोलिसांनी दोन तस्करांना अटक केली असून, त्यांच्याकडून तब्बल ७६ लाख ३० हजार ५०० रुपये किमतीचा १५२.६१ किलो गांजा जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार अवैध धंद्यांवर कारवाईसाठी



**जप्त मुद्देमाल**

या कारवाईत १५२.६१ किलो उच्च दर्जाचा गांजा (किंमत ७६,३०,५००), वाहतुकीसाठी वापरलेली बारा लाख रुपये किमतीची टाटा नेक्सॉन कार (एमएच-१२-युएफ-९११३), ३२ हजार रुपये किमतीचे दोन मोबाईल व रोख १७ हजार ९७० रुपये असा एकूण ८८ लाख ७७ हजार ४७० रुपयांचा मुद्देमाल आरोपींकडून जप्त करण्यात आला.

## शहरी भागात १० टक्के पाणी कपात

### । उपलब्ध पेयजल जबाबदारीने वापरा
### । हरिभुमी प्रतिष्ठानचे आवाहन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** एल निनोच्या प्रभावामुळे यंदा राज्यात पर्जन्यमानात घट झाल्याने उपलब्ध जलसाठ्याचे काटेकोर नियोजन करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. त्यानुसार राज्यातील सर्व शहरांमध्ये १६ ऑक्टोबरपासून १० टक्के पाणी कपात लागू करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर उपलब्ध असलेल्या पेयजलाचा नागरिकांनी जबाबदारीने व काटकसरीने असे आवाहन हरिभूमि प्रतिष्ठानचे अध्यक्ष अभय ललवाणी यांनी केले आहे.

पेयजलाचा वापर अंगणात सडा मारणे, वाहने धुणे इ. अनावश्यक कारणांसाठी कटाक्षाने टाळावा. याचबरोबर पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी घर कार्यालयातील टिपकणारे नळ, गळती पाईपलाईन इत्यादी तातडीने दुरुस्त करून घ्यावे. शक्य तेवढा पाण्याचा पुनर्वापर करावा.संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेता शासनाने प्रशासकीय पातळीवर उपाययोजना सुरू केल्या आहेत. परंतु त्याकरिता नागरिकांचेही सहकार्य



अपेक्षित असते. आज प्रत्येक नागरिकाने "गरजेपुरते पाणी, काटकसरीचा वापर आणि प्रत्येक थेंबाचा पुनर्वापर" ही जीवनशैली स्वीकारण्याची गरज आहे.

पाणी उपलब्ध आहे म्हणून त्याचा अमर्याद वापर करणे योग्य नाही. आज वाचवलेला प्रत्येक थेंब उद्याच्या पाणीटंचाईच्या काळात महत्त्वाचा ठरू शकतो. त्यामुळे नागरिकांनी स्वतःहून पाणी बचतीची सुरुवात घरापासूनच करावी, असे आवाहन अभय ललवाणी यांनी केले आहे.

### जिल्हा भाजपच्या वतीने उद्या

## विकसित भारत संकल्प सभा आणि सेवा ज्योती यात्रेचे शहरात आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या राजकीय व सामाजिक कारकीर्दीस २५ वर्ष पूर्ण झाली आहेत. यानिमित्ताने अहिल्यानगर जिल्हा व शहर भारतीय जनता पार्टीच्या वतीने बुधवारी ७ ऑक्टोबर रोजी विकसित भारत संकल्प सभा आणि सेवा ज्योती यात्रेचे आयोजन शहरात केले आहे. सकाळी ९ वाजता आनंदधाम समोरील केशर गुलाब मंगल कार्यालयात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहीती शहर जिल्हाअध्यक्ष अनिल मोहीते यांनी दिली.

नरेंद्र मोदी यांच्या गुजरातचे मुख्यमंत्री ते पंतप्रधान या कारकिर्दीला यंदा २५ वर्ष पूर्ण झाली आहेत. याचा अभिमान आहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व भाजपच्या पदाधिकारी, लोकप्रतिनिधी व कार्यकर्त्यांना आहे. यानिमित्ताने बुधवारी विकसित भारत संकल्प सभा आणि सेवा ज्योती यात्रेचे केले असून सकाळी ९ वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृष्य प्रणालीद्वारे विकसित भारत संकल्प सभेस मार्गदर्शन करून पदाधिकारी कार्यकर्ते आणि नागरीकांशी संवाद साधणार आहेत. या संकल्प सभेस विधानपरीषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, जलसंपदा तथा पालक मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, भाजपाचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, आ.मोनिका राजळे, आ.विक्रमसिंह पाचपुते, आ.अक्षय कर्डीले, आ.प्राजक्त तनपुरे, आ.विवेक कोल्हे, जिल्हा प्रभारी माजी आमदार राम सातपुते, लक्ष्मण सावजी व भैरवी वाघ-पलांडे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व आजी




माजी पदाधिकारी उपस्थित राहाणार असल्याचे, जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांनी सांगितले.

संकल्प सभेनंतर सेवा ज्योती यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. या यात्रेस केशर गुलाब मंगल कार्यालयापासून प्रारंभ होऊन शहरातील महापुरूषांच्या पुतळ्यांना अभिवादन करून ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदीरात महाआरतीने यात्रेचा समारोप होईल. यासर्व कार्यक्रमास जिल्ह्यातील पदाधिकारी कार्यकर्त्यांनी मोठ्या ■ पान ४ वर

## जिल्हा बँक निवडणुकीत पारनेरमधून विक्रमी अर्ज

### खा. लंके यांच्या विरोधात कोण? उत्सुकता शिगेला , अंतिम चित्र माघारीनंतरच स्पष्ट होणार

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी राजकीय पातळीवर हालचाली सुरू असतानाच पारनेर तालुक्यातून यंदा विक्रमी उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. बँकेच्या इतिहासात प्रथमच पारनेर तालुक्यातील विविध मतदारसंघांतून मोठ्या संख्येने उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याने निवडणुकीतील राजकीय समीकरणे चर्चेत आली आहेत. विशेषतः पारनेर तालुका सेवा संस्था मतदारसंघातून तब्बल चार उमेदवारांनी एकूण दहा अर्ज दाखल केल्याने खासदार नीलेश लंके यांच्या विरोधात नेमका कोणता उमेदवार रिंगणात राहणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

**सेवा संस्था मतदारसंघातच सर्वाधिक चुरस**

पारनेर तालुका सेवा संस्था मतदारसंघातून खासदार नीलेश लंके यांनी दोन अर्ज दाखल केले आहेत. आमदार काशिनाथ दाते यांनीही दोन अर्ज दाखल केले असून गीतांजली उदय शेळके यांनी चार, तर राहुल शिंदे पाटील यांनी दोन अर्ज दाखल केले आहेत. खासदार लंके यांनी आपली उमेदवारी निश्चित असल्याचे यापूर्वीच जाहीर केले आहे. त्यामुळे आता त्यांच्या विरोधात महायुती अथवा अन्य राजकीय गटाकडून कोणाला उमेदवारी मिळणार, याकडे लक्ष लागले आहे. सुरुवातीपासून विखे गटाकडून राहुल शिंदे पाटील हे संभाव्य उमेदवार असल्याची चर्चा होती. त्यांनी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अंतिम दिवशी अर्ज दाखल केल्याने त्यांची उमेदवारी निश्चित मानली जात आहे. मात्र, त्याआधीच आमदार काशिनाथ दाते यांनी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांसह अर्ज दाखल केल्याने समीकरणात आणखी एक ट्विस्ट निर्माण झाला आहे. गीतांजली शेळके यांनीही समर्थकांसह स्वतंत्रपणे अर्ज दाखल केल्याने सेवा संस्था मतदारसंघातील चुरस वाढली आहे.

■ पान ४ वर

## जिल्हा बँकेच्या उमेदवारी अर्जांवर आक्षेपांचा पाऊस; उद्या चित्र स्पष्ट

### अनेक अर्जांवर हरकती; सुजय विखे पाटील, राहुल जगताप, किरण लहामटे, मोनिका राजळे, प्रणोती जगताप यांच्या अर्जांवरही आक्षेप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या २१ संचालक पदांसाठी सुरू असलेल्या निवडणूक प्रक्रियेत मंगळवारी (ता.६) उमेदवारी अर्जांची छाननी झाली. विविध अर्जांवर हरकती घेण्यात आल्याने दिवसभर निवडणूक कार्यालयाच्या परिसरात राजकीय हालचालींना वेग आला. माजी खासदार सुजय विखे पाटील, माजी आमदार राहुल जगताप, आमदार किरण लहामटे आणि आमदार मोनिका राजळे यांच्या उमेदवारी अर्जांवरही आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मंगेश सुरवसे यांच्या मार्गदर्शनाखाली



अर्ज छाननीची प्रक्रिया पार पडली. छाननीदरम्यान काही उमेदवारांच्या अर्जांसोबत आवश्यक कागदपत्रे नसल्याचे निदर्शनास आले. लेखापरीक्षण अहवाल, आधार कार्ड तसेच अन्य कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी संबंधित ■ पान ४ वर

## रामकृष्णाच्या विद्यार्थ्यांचे बहारदार राज्याभिषेक सादरीकरण




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीराम कृष्ण एज्युकेशन फाउंडेशनच्या सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना ज्युनिअर कॉलेज मधील ७५ विद्यार्थ्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे अतिशय सुंदर, विलोभनीय सादरीकरण केले.

श्री रामकृष्ण सेवा ट्रस्ट तर्फे दिनांक २९ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर या कालावधीमध्ये परमपूज्य गोविंद देवगिरी महाराज यांच्या सुश्रुत वाणी मधून श्री शिवछत्रपती चरित्र कथा घेण्यात आले.

रामकृष्ण सेवा ट्रस्टचे अध्यक्ष श्री नंदलाल मणियार ,ट्रस्टी श्री मोहनलाल मानधना, श्री बजरंग दरक यांच्या प्रेरणे मधून श्री रामकृष्ण शाळेच्या विद्यार्थ्यांनी कथेच्या पहिल्या दिवशी क्रीडा शिक्षक श्री दीपक धनवटे यांच्या मार्गदर्शना अंतर्गत ढोल ताशा व लेझीमच्या गजरात महाराजांचे स्वागत करून कथेला सुरुवात झाली. कथेच्या दरम्यान प्रत्येक दिवशी शाळेच्या संगीत शिक्षकां सौ पुष्पा औटी यांच्या प्रयत्नातून कथेच्या आधी रामकृष्णच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुमधुर अशी शिवाजी महाराजांची गीते सादर करून वातावरण निर्मिती करत प्रेक्षकांची मने जिंकली.

३ ऑक्टोबरला कथेच्या शेवटच्या दिवशी संस्थेच्या ७५ विद्यार्थ्यांनी बहारदार असा शिवराज्याभिषेकाचा कार्यक्रम सादर केला. यामध्ये संस्थेतील विद्यार्थ्यांसह मनसेचे जिल्हाध्यक्ष श्री सुमित वर्मा यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका तर जिजामातेच्या भूमिकेमध्ये ॲड अनुराधा येवले यांनी अत्यंत प्रभावीपणे साकारली. शिवराज्याभिषेकाच्या कार्यक्रमाचे लेखन शाळेच्या उप मुख्याध्यापिका संपदा देशपांडे , दिग्दर्शन श्री प्रसाद बेडेकर, नृत्यदिग्दर्शन श्री अभिजीत शिर्के, नेपथ्य ,वेशभूषा, रंगभूषा श्री श्रेया कुमार गुंडू, सौ रोथेल लोंढे व सौ ■ पान ४ वर

## नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर केडगाव देवी परिसराची महापौर, आयुक्तांकडून पाहणी

### स्वच्छता, पाणी, विद्युत व्यवस्था, रस्ते, मोकाट कुत्रे, जनावरे व अतिक्रमणांबाबत तातडीच्या उपाययोजनांच्या सूचना । भाविकांनी कायनेटिक चौक-मोहिनीनगर रेल्वे भुयारी मार्गाचा वापर करावा - महापौर ज्योतीताई गाडे

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नवरात्रोत्सवाचा सण जवळ आला असून, केडगाव देवी मंदिर परिसरात दर्शनासाठी जिल्हाभरातून मोठ्या संख्येने भाविक येत असतात. या पार्श्वभूमीवर भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी महापौर ज्योतीताई गाडे व मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी केडगाव देवी परिसराची पाहणी केली. यावेळी स्वच्छता, पाणी, विद्युत व्यवस्था, रस्त्यांचे पॅचिंग, मोकाट कुत्रे, जनावरे, अतिक्रमणे आदी विविध बाबींचा आढावा घेऊन संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यावेळी स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, नगरसेविका कमल कोतकर, नगरसेविका अश्विनी लोंढे यांच्यासह इंजिनिअर महादेव काकडे, श्रीकांत निंबाळकर, आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, उद्यान प्रमुख शशिकांत नजन, विद्युत विभाग प्रमुख शांताराम क्षेत्रे आदी उपस्थित



होते.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, केडगाव देवी हे भाविकांचे श्रद्धास्थान असून नवरात्रोत्सवात जिल्हाभरातून मोठ्या संख्येने भाविक दर्शनासाठी येतात. या काळात भाविकांची कोणत्याही प्रकारची ■ पान ४ वर

## दै. आकर्षण निवडक

### निवासी जागेचा प्रश्न; न्यायासाठी नंदू पारखे यांचा आमरण उपोषणाचा इशारा

अहिल्यानगर- पिंपरी निर्मळ येथील निवासी जागेचा प्रश्न मार्गी लावून न्याय मिळावा, तसेच अमरधामच्या विस्तारासाठी ताब्यात घेतलेली जागा तत्काळ मोकळी करावी, या मागणीसाठी नंदू पोपट पारखे यांनी तहसीलदार, राहाता यांना निवेदन देत २१ ऑक्टोबर रोजी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. निवेदनात पारखे यांनी म्हटले आहे की, ते पिंपरी निर्मळ गावचे कायमस्वरूपी रहिवासी असून ग्रामपंचायत हद्दीतील शासकीय गट क्रमांक ३२७ मध्ये त्यांच्या कुटुंबाच्या मिळकतींची ग्रामपंचायत दप्तरी नोंद आहे. लक्ष्मीबाई सर्जन पारखे यांच्या नावावर मिळकत क्र. १३६६, चंदू पोपट पारखे यांच्या नावावर १३८७ तर नंदू पोपट पारखे यांच्या नावावर १४९० अशी नोंद असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. गेल्या सुमारे ३५ वर्षांपासून या जागेवर वास्तव्य असून २००७ पासून संबंधित जागेचा नियमित कर भरत असल्याचा दावा त्यांनी केला आहे. तसेच शासनाच्या नियमानुसार निवासी अतिक्रमण नियमानुकूल करण्याची प्रक्रिया सुरू असताना आवश्यक कागदपत्रांसाठी ग्रामपंचायतीकडे अर्ज केला होता. मात्र, ग्रामसेवकांकडून दमदाटी व अपमानास्पद वर्तन करण्यात आल्याचा आरोप त्यांनी निवेदनात केला आहे. दरम्यान, घराशेजारील स्मशानभूमीच्या विस्तारासाठी कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या घराची जागा ताब्यात घेण्यात आल्याचे पारखे यांनी म्हटले आहे. राहण्यासाठी अन्य कोणतीही जागा नसताना कुटुंबाला अडचणीत आणले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. अमरधाम विस्तारासाठी गावात अन्य पर्याय उपलब्ध असतानाही आपल्या कुटुंबाच्या निवासी जागेवरच कारवाई करण्यात येत असल्याने या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.मिळकत क्र. १३६६, १३८७ व १४९० या तीनही जागांवरील निवासी अतिक्रमण शासनाच्या नियमानुसार नियमित करण्यात यावे, १ ऑक्टोबरपासून उपोषणाच्या तारखेपर्यंत ग्रामपंचायतीकडून जबरदस्तीने कोणतेही बांधकाम करण्यात आले असल्यास ते हटवावे, ग्रामसेवक, सरपंच, उपसरपंच व दोषी ग्रामपंचायत सदस्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशा मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. तसेच कुटुंबाकडे अन्यत्र खाजगी किंवा सरकारी जागा नसल्याने संबंधित जागाच नियमित करावी आणि रमाई आवास योजनेतून घरकुल मंजूर करण्यासाठी प्रस्ताव तातडीने पाठवावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.या प्रकरणी तहसील प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन निष्पक्ष चौकशी करून न्याय द्यावा, अशी अपेक्षा पारखे यांनी व्यक्त केली आहे. निवेदनाच्या प्रती मा.तहसीलदार, मा. जिल्हाधिकारी, मा. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी,मा.जिल्हा पोलिस प्रमुख अहिल्यानगर यांना देण्यात आल्या आहेत. व संबंधित अधिकाऱ्यांना लवकरच देण्यात येणार आहेत.

### निवासी जागेचा प्रश्न; न्यायासाठी नंदू पारखे यांचा आमरण उपोषणाचा इशारा

अहिल्यानगर - राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक कार्यकर्ते संभाजी पवार यांच्या वतीने वाडिया पार्क येथील महात्मा गांधी यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी बोलताना सामाजिक कार्यकर्ते संभाजी पवार म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांना 'चले जाव'ची घोषणा देत राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी स्वातंत्र्यलढा उभारला आणि देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. महात्मा गांधी यांचे विचार आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी आहेत. त्यांनी संपूर्ण देशाला अहिंसेच्या मार्गाची शिकवण दिली. त्यांच्या विचारांची आजच्या काळातही गरज असून युवकांनी त्यांच्या विचारांपासून प्रेरणा घ्यावी, असे त्यांनी सांगितले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते संभाजी पवार आणि डॉ. बलराज पाटील उपस्थित होते.

### रांजणगाव मशिदच्या गट नं. १९५ व २५५ चा फेरफार वादात; महसूल अधिकाऱ्यांविरुद्ध तक्रार

अहिल्यानगर - मौजे रांजणगाव मशिद (ता. पारनेर) येथील गट नं. १९५ व २५५ संदर्भातील फेरफार नं. ८०३० बेकायदेशीरपणे मंजूर केल्याचा आरोप करीत महसूल अधिकाऱ्यांविरुद्ध अन्याय निवारण निर्मूलन सेवा समितीच्या वतीने तक्रार दाखल करण्यात आली आहे. याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांवर चौकशी करून कारवाई करावी, या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले असल्याची माहिती समितीचे जिल्हाध्यक्ष अरुण रोडे यांनी दिली. समितीने दिलेल्या निवेदनानुसार, रांजणगाव मशिद येथील गट नं. १९५ व २५५ या शेतमिळकतीचे महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम ८५ अन्वये वाटप झाले होते. त्यानंतर फेरफार नं. ३५४४ मंजूर करण्यात आला होता. या फेरफाराविरोधात नाशिक विभागीय आयुक्तांकडे रिव्हीजन अर्ज नं. ५१२/२०२५ दाखल करण्यात आला होता.

## ५२ वर्षांनंतरही मैत्रीचा धागा कायम! अहमदनगर बॉईज हायस्कूलच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शालेय जीवन संपून तब्बल ५२ वर्षांचा प्रदीर्घ काळ लोटला, जीवनाच्या प्रवासात प्रत्येकाची वाट वेगळी झाली, अनेकांनी संसार थाटले, मुलांचे संसार पाहिले आणि आता अनेक जण आजोबा झाले; मात्र मैत्रीचे बंध मात्र आजही तितकेच घट्ट आहेत. मराठी मिशनच्या अहमदनगर बॉईज हायस्कूलच्या सन १९७३-७४ च्या मॅट्रिक (इयत्ता अकरावी) बॅचच्या माजी विद्यार्थ्यांनी अर्धशतकानंतरही आपला स्नेहबंध जपला आहे. या वर्गमित्रांचा स्नेहमेळावा शहरातील एका हॉटेलमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

सोशल मीडियाच्या माध्यमातून आज जगाच्या कानाकोपऱ्यातील माणसे एकमेकांच्या संपर्कात येत असली, तरी ५२ वर्षांपूर्वी शाळेत एकत्र शिकलेल्या मित्रांनी आपले नाते केवळ संपर्कापुरते मर्यादित न ठेवता ते आजही जिवंत ठेवले आहे. दरवर्षी हे माजी विद्यार्थी एकत्र येतात. उतारवयाकडे वाटचाल सुरू असतानाही शालेय सवंगड्यांमधील जिव्हाळा, आपुलकी आणि मैत्रीचा ओलावा कायम असल्याचे या स्नेहमेळाव्यातून पुन्हा एकदा दिसून आले.

या स्नेहमेळाव्यात सहभागी झालेल्या माजी विद्यार्थ्यांनी जणू पुन्हा एकदा आपला शाळेचा वर्ग भरविला. एकमेकांना भेटताच जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. शाळेतील गंमती-जमती, शिक्षकांचे मार्गदर्शन, मित्रांसोबत केलेली मस्ती, परीक्षा, खेळ, शाळेतील प्रसंग अशा असंख्य आठवणींना उजाळा देत मित्रांनी मनमुराद गप्पा मारल्या.

वयाची अनेक दशके उलटली असली तरी एकमेकांसमोर येताच शाळेतील तोच उत्साह आणि आपलेपणा अनुभवायला मिळाला. जुन्या आठवणी सांगताना अनेक मित्र भारावून गेले. चांगल्या-वाईट प्रसंगांचा इतिहास सांगताना हास्याचे फवारे उडाले, तर काही आठवणींनी डोळ्यांच्या कडा ओलावल्याचे भावनिक चित्रही पाहायला मिळाले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी निधन झालेल्या वर्गमित्रांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आयुष्याच्या प्रवासात आपल्यातून निघून गेलेल्या सवंगड्यांच्या आठवणींना उजाळा देताना उपस्थित मित्र भावूक झाले. शालेय जीवनातील मैत्री ही केवळ त्या काळापुरती मर्यादित नसून आयुष्यभराची सोबत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. या स्नेहमेळाव्यासाठी अहिल्यानगर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांतूनही माजी विद्यार्थी आपल्या जुन्या मित्रांना भेटण्यासाठी एकत्र आले होते. जीवनाच्या प्रवासात अनेक मित्र दूर गेले. नोकरी, व्यवसाय, संसार आणि विविध कारणांमुळे भौगोलिक अंतर वाढले; मात्र वर्गमित्र म्हणून निर्माण झालेले स्नेहबंध हे अंतरही ओलांडून आजपर्यंत कायम राहिले आहेत.

अंतराने कितीही दूर गेलो, तरी वर्गमित्र या नात्याची गोड शिदोरी आयुष्यभर सोबत राहणार आहे, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली. शाळेतील मैत्री ही आयुष्यातील सर्वात निरागस आणि निस्वार्थ नातींपैकी एक असल्याचे यावेळी अनेकांनी सांगितले. मुलांचे संसार थाटून, कुटुंबाची जबाबदारी पार पाडल्यानंतर आता जीवनाच्या उतारवयात प्रवेश केलेल्या या मित्रांना जुन्या सवंगड्यांच्या भेटीतून आनंदाचे क्षण मिळावेत, एकमेकांच्या सुख-दुःखात सहभागी होता यावे आणि जुन्या आठवणींना उजाळा मिळावा, या उद्देशाने दरवर्षी या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात येते.

आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक नाती दुरावत असताना, ५२ वर्षांनंतरही शालेय मित्रांचे नाते जपले जाणे ही निश्चितच कौतुकास्पद बाब असल्याचे यावेळी उपस्थितांनी नमूद केले. या स्नेहमेळाव्यास हिरालाल चेंगेडिया, अनिल औटी, बंडू बनकर, सतीश जाधव, जफर खान, रावसाहेब नेटके, सुधीर नवगिरे, अविनाश रावडे, विजय सात्राळकर, अल्ताफ शेख, शांतीलाल शिंगवी, बाळू शिंदे, रमेश थोरात, सुरेश वाघमारे, बाबा भालेराव, विनीत मकासरे, हबीब पेंटर, सॅम्युअल साळवी, किरण पवार, शशिकांत वाघमारे, चंद्रशेखर जाधव, गंगाराम मगर आदी माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक हिरालाल चेंगेडिया यांनी करून ग्रुपच्या वाटचालीची माहिती दिली. सर्व विद्यार्थ्यांचा परिचय विनीत मकासरे यांनी करून दिला. जफर खान यांनी उपस्थित सर्व माजी विद्यार्थ्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल औटी यांनी केले, तर विजय सात्राळकर यांनी आभार मानले.

## ज्ञानसंपदा शाळेत स्वच्छता अभियानातून 'स्वच्छतेचा संस्कार'

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** ज्ञानसंपदा शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्ष २०२६-२७ निमित्त तसेच राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून शाळेतील इयत्ता ५ वी व ६ वीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता अभियान राबविण्यात आले. सकाळी ८.४५ वाजता आयोजित या उपक्रमात एकूण १७९ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांचे छोटे-छोटे गट तयार करून त्यांना परिसरनिहाय स्वच्छतेची जबाबदारी देण्यात आली. रामकृष्ण मठ परिसर, शिवमंदिर परिसर व मूकबधिर विद्यालय परिसर तसेच शाळेचा परिसर या ठिकाणी विद्यार्थ्यांनी स्वच्छता केली. विद्यार्थ्यांनी हातमोजे व कचरा संकलनाच्या पिशव्यांचा वापर करून परिसरातील कचरा गोळा केला.

यावेळी ओला व सुका कचरा वेगळा करण्याचे महत्त्व, कचऱ्याचे योग्य संकलन व स्वच्छ परिसराचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. संकलित कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेशी संवाद साधण्यात आला. ''स्वच्छता ही केवळ एक दिवसाची मोहीम नसून ती प्रत्येकाच्या जीवनशैलीचा भाग झाली पाहिजे,'' असा संदेश या उपक्रमातून विद्यार्थ्यांना देण्यात आला. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेची सवय, सामाजिक जबाबदारी आणि पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरला.

## मनपा शालेय मैदानी क्रीडा स्पर्धेत आयकॉन पब्लिक स्कूलचे मोठे यश

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने आयोजित शालेय मैदानी क्रीडा स्पर्धा पोलीस परेड ग्राउंड येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. या स्पर्धेत द आयकॉन पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट क्रीडा कौशल्याचे प्रदर्शन करत उल्लेखनीय यश संपादन केले.

थाळीफेकमध्ये ईश्वरी सूर्यवंशी (अंडर १४) प्रथम क्रमांक, लांब उडी (अंडर १७) भार्गव पिंपळे प्रथम क्रमांक, गोळाफेक (अंडर १४) श्रेया पितळे तृतीय क्रमांक, मुले रिले संघ (अंडर १७) भार्गव पिंपळे, अनुज दरेकर, आदित्य शिंदे आणि सम्यक छाजेड यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशामागे त्यांची मेहनत, जिद्द आणि सातत्यपूर्ण सराव यासोबतच क्रीडा शिक्षक जॉर्ज थोरात यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. संस्थेच्या अध्यक्षा मंगला मुथा, चेअरमन अशोक मुथा, संचालक (प्रशासन) कर्नल आर. सी. राणा, ट्रस्टी निर्मल मुथा आणि अमित मुथा, प्राचार्या दीपिका नगरवाला यांनी या उल्लेखनीय कामगिरीचे कौतुक करत विद्यार्थी व मार्गदर्शक यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. हा उपक्रम द आयकॉन पब्लिक स्कूलच्या शैक्षणिक गुणवत्ता, मूल्याधिष्ठित शिक्षण आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असलेल्या बांधिलकीची साक्ष देणारा ठरला.

## कै. बाई इचरजबाई फिरोदिया स्मरणार्थ ३५ व्या आंतरशालेय स्पर्धांचे उत्साहात उद्घाटन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** कै. बाई इचरजबाई फिरोदिया स्मरणार्थ ३५ व्या आंतरशालेय स्पर्धांचे उद्घाटन सोमवार दि. ०५ ऑक्टोबर २०२६ रोजी अ.ए.सो. ची बाई इचरजाबाई फिरोदिया प्रशाला,नवीपेठ, अहिल्यानगर येथे फिरोदिया कुटुंबातील ज्येष्ठ सदस्या ललिताभाभी फिरोदिया, अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह श्रीमती छायाताई फिरोदिया, संस्थेच्या ज्येष्ठ विश्वस्त श्रीमती सुनंदाताई भालेराव सल्लागार मंडळाचे सदस्य श्री. भूषणजी भंडारी, वेगवेगळया स्पर्धेसाठी परीक्षक म्हणून आमंत्रित मा. ऋतुजा पाठक, अनुजा कुलकर्णी, श्रीमती उषा सारसर, श्री. अमोल शिंदे, कु. मैथिली जोशी, सौ. सोनाली बोरा, सौ. पूजा चंगेडिया, प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ.ज्योती सिसोदिया इ. मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन समारंभ पार पडला.

या उद्घाटन प्रसंगी श्रीमती छायाताई फिरोदिया यांनी आपल्या प्रास्ताविक मनोगतातून सांगितले की, अनेक वर्षांपासून या स्पर्धांमध्ये शहरातील अनेक शाळा उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवितात याचा आनंद वाटतो. कै. बाई इचरजबाई यांचे या शाळेशी खूप ऋणानुबंध होते.या स्पर्धा पार पाडण्यासाठी प्रशालेतील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अथक परिश्रम घेतात.स्पर्धेत विद्यार्थी चांगली तयारी करून येतात यासाठी विद्यार्थी व पालकांचे कौतुक वाटते.

सदर प्रसंगी संस्थेच्या तसेच अहिल्यानगर शहरातील विविध शाळांचे मुख्याध्यापक, पूर्व प्राथमिक वर्गांचे इन्चार्ज,पालक, विदयार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहशिक्षक श्री.वैभव वाघ यांनी तर आभार प्रदर्शन सौ .शकुंतला देसर्डा यांनी केले.

चार दिवस चालणाऱ्या या आंतरशालेय स्पर्धेत चित्रकला, रांगोळी, फॅन्सी ड्रेस, नृत्य, कथाकथन, गायन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले आहे. कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न होण्यासाठी मुख्याध्यापिका सौ ज्योती सिसोदिया यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशालेतील सर्व शिक्षक व कर्मचारी वृंद यांनी परिश्रम घेतले.

## नेप्ती मंडळात नुकसानीच्या पाहणीसाठी अधिकारी बांधावर

### एकही बाधित शेतकरी वंचित राहणार नाही – मंडळ अधिकारी प्रताप कळसे

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील नेप्ती महसूल मंडळातील नेप्ती, निमगाव वाघा, पिंपळगाव वाघा, हिंगणगाव, हमीदपूर, जखणगाव, हिवरे बाजार, टाकळी खातगाव, आणि निमगाव घाणा या दहा गावांमध्ये दुष्काळसदृश परिस्थितीमुळे खरीप हंगामातील पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्याने शेतात उभी असलेली पिके जागेवरच करपून गेली असून शेतकरी अक्षरशः उघड्यावर आला आहे. या पार्श्वभूमीवर महसूल आणि कृषी विभागाच्या संयुक्त पथकाने थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी सुरू केली असून, या संकटात एकही बाधित शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, सर्व पंचनामे पारदर्शकपणे करून शासनाला अहवाल पाठवला जाईल, अशी ठाम ग्वाही नेप्ती मंडळ अधिकारी प्रताप कळसे यांनी दिली. ते नेप्ती येथे दुष्काळी परिस्थितीच्या पाहणी दौऱ्यादरम्यान शेतकऱ्यांशी बोलत होते.

शेतकऱ्यांनी मोठ्या आशेने बाजरी, मका, सोयाबीन, तुर आदी पिकांची पेरणी केली होती. मात्र पावसाने अचानक पाठ फिरवली. नेप्ती मंडळात पाऊस कमी झाला . परिणामी पिकांना आवश्यक असलेले पाणी मिळाले नाही. त्यामुळे पिकाची पूर्णपणे नासाडी झाली आहे. शेतकऱ्यांनी कर्ज काढून, सावकाराकडून पैसे घेऊन केलेली सर्व मेहनत वाया गेली आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील आणि तहसीलदार मिलिंद कुलथे यांच्या मार्गदर्शनाखाली नेप्ती मंडळासाठी १० विशेष पथके तयार करण्यात आली आहेत. प्रत्येक पथकात ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहाय्यक व ग्राम पंचायत अधिकारी यांचा समावेश आहे. ही पथके गावनिहाय आणि शिवारनिहाय प्रत्येक शेतात जाऊन नुकसानीची वस्तुनिष्ठ नोंद घेत आहेत.

यावेळी बोलताना मंडळ अधिकारी प्रताप कळसे म्हणाले, बाधित शेतकरी एकही पंचनाम्यापासून वंचित राहू नये, यासाठी आम्ही गावनिहाय पथकांची नियुक्ती केली आहे. एकही शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही आणि शासनाच्या नियमानुसार नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.''

नेप्ती येथील शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणी दौऱ्यावेळी पंचायत समिती अहिल्यानगरचे माजी उपसभापती डॉ. दिलीप पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांनी स्वतः शेतात उतरून करपलेल्या पिकांची पाहणी केली.

## बालनाट्याच्या रंगमंचापासून 'धप्पा'च्या रुपेरी पडद्यापर्यंत गायत्रीची झेप!

### अहिल्यानगरच्या सप्तरंग थिएटर्स ची बालकलाकार गायत्री सागर रोहोकले ची उल्लेखनीय वाटचाल; राज्यस्तरीय अभिनय पुरस्कारांनंतर आता चित्रपटात महत्त्वाची भूमिका

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अभिनयाची आवड आणि रंगभूमीवरील आत्मविश्वासाच्या जोरावर बालनाट्याच्या रंगमंचावरून आपल्या कलाप्रवासाची सुरुवात करणाऱ्या अहिल्यानगरच्या गायत्री सागर रोहोकले ने आता रुपेरी पडद्यावर झेप घेतली आहे. महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेतील उल्लेखनीय कामगिरी, उत्कृष्ट अभिनयासाठी मिळालेले राज्यस्तरीय सन्मान आणि विविध सांस्कृतिक क्षेत्रातील सहभागानंतर गायत्री आता 'धप्पा' या मराठी चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे.

गायत्रीने महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत आयोजित महाराष्ट्र राज्य बालनाट्य स्पर्धेत विविध वर्षांत सहभाग घेतला. बालनाट्याच्या माध्यमातून तिने अभिनयातील बारकावे आत्मसात केले. विविध भूमिका साकारताना तिच्या अभिनयाची दखल घेत तिला उत्कृष्ट अभिनयासाठी ३ रौप्यपदके व ५ उत्कृष्ट अभिनय गुणवत्ता पुरस्कार तसेच विविध प्रमाणपत्रे प्राप्त झाली.''अजब लोठ्यांची महान गोष्ट''




''मी तुझ्या जागी असते तर'' ''तेरा मेरा सपना ''या नाटकातील तिच्या अभिनयाला विशेष दाद मिळाली. या भूमिकेसाठी तिला राज्यस्तरीय उत्कृष्ट अभिनय रौप्यपदक सन्मान मिळाला. बालरंगभूमीवरील या यशामुळे तिच्या कलाप्रवासाला नवी दिशा मिळाली. अभिनयासोबतच गायत्रीने नृत्य, चित्रकला आणि विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्येही सहभाग घेतला आहे. रंगमंचावर मिळालेल्या अनुभवामुळे तिच्या अभिनयात आत्मविश्वास आणि व्यक्तिरेखा साकारण्याची क्षमता अधिक विकसित झाली.

आता तिच्या या प्रवासातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'धप्पा' हा चित्रपट. 'धप्पा' चित्रपटाचे दिग्दर्शन रवीराज वाव्होळे यांनी केले असून, कथा,पटकथा आणि संवाद सागर भंडारे यांचे आहेत.चित्रपटात सागर भंडारे, प्रतीक्षा अत्राम, गायत्री रोहोकले ,निलेश वैरागर, ऋषीकेश कळसकर,कृष्णा जवरे,रविराज वाव्होळे,प्रकाश भागवत, कृष्णा घोंगे यांच्यासह अनेक कलाकारांच्या भूमिका आहेत.वृंदावन एन्टरटेन्मेंट फिल्म्स प्रस्तुत हा चित्रपट ९ ऑक्टोबर २०२६ रोजी प्रदर्शित होत आहे. बालनाट्याच्या रंगमंचावरून सुरू झालेली गायत्रीची वाटचाल आता मोठ्या पडद्यापर्यंत पोहोचली आहे. राज्यस्तरीय अभिनय पुरस्कारांची शिदोरी, विविध कलाक्षेत्रातील अनुभव आणि 'धप्पा'मधील भूमिका यामुळे गायत्रीच्या कलाप्रवासाला नवे वळण मिळाले आहे. ''बालनाट्याच्या रंगमंचावर उमटलेली छोटी पावले आता रुपेरी पडद्यावर मोठी झेप घेत आहेत,'' अशी भावना तिच्या कुटुंबीयांकडून आणि तिच्या कलाप्रवासाला सुरुवातीपासून प्रोत्साहन देणाऱ्यांकडून व्यक्त होत आहे. त्यामध्ये सप्तरंग थिएटर्स अध्यक्ष डॉ.शाम शिंदे व पदाधिकारी यांचे मोठे योगदान आहे.

गायत्रीच्या या यशामुळे अहिल्यानगरच्या बालकलावंतांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे. 'धप्पा'च्या माध्यमातून तिच्या अभिनयाची नवी ओळख महाराष्ट्रातील प्रेक्षकांसमोर येणार असून, तिच्या पुढील कलाप्रवासासाठी सर्व स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत कर्नल परब्स स्कूलचे उल्लेखनीय यश:२ सुवर्ण, ४ रौप्य व १ कांस्यपदक प्राप्त



अहिल्यानगर - कर्नल परब्स स्कूल अ गुरुकुल या शाळेच्या विद्यार्थ्यांनी सीआयएससीई () राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरीची नोंद करत दैदिप्यमान यश संपादन केले आहे. २८ ते ३० सप्टेंबर २०२६ या कालावधीत जबलपूर, मध्य प्रदेश येथे आयोजित करण्यात आलेल्या या राष्ट्रीय स्पर्धेत शाळेच्या विद्यार्थ्यांनी एकूण २ सुवर्ण, ४ रौप्य आणि १ कांस्यपदकासह एकूण ७ पदके पटकावून शाळेच्या क्रीडा परंपरेत बहुमानाची भर घातली आहे.देशभरातून सहभागी झालेल्या खेळाडूंसमोर कर्नल परब्स् स्कूलच्या विद्यार्थ्यांनी क्रीडा कौशल्य, शिस्त आणि आत्मविश्वासाच्या बळावर यशस्वी कामगिरी केली. स्पर्धेतील विविध गटांमध्ये ईश्वरी जाधव आणि आराध्या खंडेलवाल यांनी सुवर्णपदक पटकावून राष्ट्रीय विजेतेपद संपादन केले. काव्या खिळे, अनय परदेशी, वेदांत बडे आणि अर्णव निकरड यांनी उपविजेतेपद मिळवत रौप्यपदकावर आपले नाव कोरले, तर श्रीराज सुरवसे याने कांस्यपदक प्राप्त केले. तसेच सिया अडसुरे आणि प्रद्युम्न शेळके यांनी राष्ट्रीय स्तरावर शाळेचे अधिकृत प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय सहभाग नोंदवला. राष्ट्रीय स्तरावर अहिल्यानगर जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करणाऱ्या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे व प्रशिक्षकांचे कर्नल परब्स् स्कूलच्या संस्थापिका सौ. गिता परब, संचालक श्री. दिलीप परब, श्री. रिकीराज परब आणि मुख्याध्यापिका कु. अर्पिता रणनवरे, शिक्षकवृंद व पालकांनी विजयी खेळाडूंचे व प्रशिक्षकांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशामागे त्यांचे अथक परिश्रम, सराव, आणि शाळा व्यवस्थापनाद्वारे उपलब्ध करून दिलेल्या भौतिक सुविधा आणि प्रशिक्षक श्री. गणेश खडका व श्री. उस्मान शेख यांचे तांत्रिक मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. हे विद्यार्थी भविष्यातही क्रीडा क्षेत्रात उत्तुंग यश प्राप्त करतील असा विश्वास कर्नल परब्स् स्कूलच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे.

### रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षात शहरातील युवकांसह ज्येष्ठ नागरिकांचा प्रवेश

अहिल्यानगर - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या विचारधारेवर विश्वास व्यक्त करत शहरातील युवकांसह ज्येष्ठ नागरिकांनी पक्षात प्रवेश केला. रिपाइंचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के यांच्या नेतृत्वाखाली सर्जेपूरा येथील रिपाइंच्या पक्ष कार्यालयात हा पक्षप्रवेश सोहळा उत्साहात पार पडला. नव्याने पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचे सुशांत म्हस्के यांनी स्वागत करून त्यांना पुढील सामाजिक व राजकीय वाटचालीस शुभेच्छा दिल्या.यावेळी अनिल वैरागर, पीटर लोंढे, सादिक शेख, प्रशांत आठवले, युसुफ शेख, चांद मणियार, फारूक शेख, अशोक वैरागर, अमीन सय्यद, मुन्ना शेख, मच्छिंद्र दांगट, राजू शेख, अर्जुन जव्हेरी, फिरोज शेख, आयन शेख आदींसह कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) मध्ये प्रवेश केला. पक्षप्रवेश सोहळ्यास दानिश शेख, राहुल ठोकळ, गुलाम शेख, विजय शिरसाठ, विल्सन रुकडीकर, प्रकाश थोरात, शुभम ठोंबे, अरबाज शेख, लकी वाघमारे, योगेश जावळे, शमुवेल साळवे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.यावेळी बोलताना सुशांत म्हस्के म्हणाले की, समाजातील तळागाळातील आणि सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) सातत्याने संघर्ष करत आहे. वंचित, दुर्बल आणि हक्कांपासून दूर राहिलेल्या घटकांचे प्रश्न शासन दरबारी मांडून त्यांना न्याय मिळवून देणे हे पक्षाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.''रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया हा सर्वसामान्य जनतेचा आवाज आहे. कोणत्याही भांडवलदार अथवा व्यापाऱ्यांच्या दावणीला न बांधता समाजातील शेवटच्या घटकाच्या हक्कासाठी पक्ष सातत्याने संघर्ष करत आहे. जनतेच्या मूलभूत प्रश्नांसाठी रस्त्यावर उतरून आवाज उठविण्याची भूमिका पक्षाने कायम ठेवली आहे,'' असे म्हस्के यांनी स्पष्ट केले.

# महिला सक्षमीकरणाचा जागर करुन प्रयास ग्रुप व दादी-नानी ग्रुपचा ३१ वा वर्धापन दिन उत्साहात

**३१ वर्षांची सामाजिक वाटचाल; प्रयास-दादी-नानी ग्रुपतर्फे महिलांचा सन्मान आणि विविध उपक्रम**
**विविध स्पर्धांतील विजेत्यांचा गौरव; गरबा, बौद्धिक व मनोरंजनात्मक खेळांनी रंगला सोहळा**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** महिला सक्षमीकरणासोबतच महिलांच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांना आत्मनिर्भर बनविणे आणि सामाजिक क्षेत्रात महिलांचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने गेल्या ३१ वर्षांपासून कार्यरत असलेल्या प्रयास ग्रुप आणि दादी-नानी ग्रुपचा ३१ वा वर्धापन दिन महिला शक्तीचा जागर करीत मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त महिलांसाठी विविध बौद्धिक, मनोरंजनात्मक तसेच सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धांमध्ये विजेत्या ठरलेल्या महिलांना प्रमुख पाहुण्या पार्वती (काकी) जगताप व माजी नगरसेविका सुवर्णाताई जाधव यांच्या हस्ते बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

अलका मुंदडा यांनी स्थापन केलेल्या प्रयास ग्रुपच्या सामाजिक कार्याला यंदा ३१ वर्षे पूर्ण झाली आहेत. या प्रदीर्घ वाटचालीत महिलांच्या आरोग्यापासून त्यांच्या आत्मनिर्भरतेपर्यंत विविध उपक्रम राबविण्यात आले. महिलांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करणे, त्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे आणि सामाजिक कार्याची जाणीव निर्माण करणे, या उद्देशाने ग्रुपच्या माध्यमातून सातत्याने विविध उपक्रम राबविले जात आहेत. या वर्धापन दिन सोहळ्यात ग्रुपच्या कार्यात नेहमीच सक्रिय सहभाग देणाऱ्या दादी-नानी ग्रुपच्या अध्यक्षा जयाताई गायकवाड, ॲड. ज्योत्स्ना कुलकर्णी, मनीषा पवार आणि लीला अग्रवाल यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच वर्षभरातील विविध उपक्रमांसाठी विशेष सहकार्य करणाऱ्या मेघना मुनोत, दीपा मालू आणि दीपा सोनी यांचाही विशेष सन्मान करण्यात आला.यावेळी उपाध्यक्ष सुचेता बोरकर, सचिव मीनाक्षी पाठक, संस्थापक अध्यक्षा अलकाताई मुंदडा, खजिनदार मेघना मुनोत, सरस्वती झंवर, सोनाली थोरात, गुंजली खिलारी, सुनिता चक्रवती, सविता धामट, मीरा पाटील, संपुर्णा देशमुख, आरती भुतडा, वैशाली क्षीरसागर, प्रिया गुंदेचा, मुनोत उषा, सोनी नीलिमा पवार, प्रतिभा भिसे, आरती थोरात, सोनी पुरनाळे, संगीता दंडवाणी, सुजाता कदम, सुरेखा जंगम, अरुणा गोयल, अलका वाघ, सुनीता काळे, ॲड. स्वाती जाधव, वैदेही बल्लाळ, प्रिया शिंदे, उज्वला बोगावात, रेखा फिरोदिया, जयश्री पुरोहित, उषा सोनटक्के, शशिकला झरेकर, सुशीला त्र्यंबके, ज्योती गांधी, आशा गायकवाड, दीपा मालू, दीपा सोनी आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

पार्वती (काकी) जगताप म्हणाल्या की, महिलांनी केवळ कुटुंबाची जबाबदारी सांभाळण्यापुरते मर्यादित न राहता सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही पुढाकार घेतला पाहिजे. महिला सक्षम झाल्या तर कुटुंब सक्षम होते आणि सक्षम कुटुंबातूनच सक्षम समाजाची निर्मिती होते. प्रयास ग्रुप आणि दादी-नानी ग्रुप गेल्या ३१ वर्षांपासून महिलांना एकत्र आणून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. अशा उपक्रमांमुळे महिलांच्या कलागुणांना वाव मिळतो तसेच त्यांच्या आयुष्यात आनंदाचे क्षण निर्माण होतात. या सामाजिक कार्याची वाटचाल भविष्यातही अधिक व्यापक व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

माजी नगरसेविका सुवर्णाताई जाधव म्हणाल्या की, आजच्या काळात महिलांनी स्वतःच्या क्षमता ओळखून प्रत्येक क्षेत्रात आत्मविश्वासाने पुढे जाण्याची गरज आहे. महिलांमध्ये प्रचंड क्षमता असून योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळाल्यास त्या कोणत्याही क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करू शकतात. महिला सक्षमीकरणाची संकल्पना केवळ भाषणांपुरती मर्यादित न राहता प्रत्यक्ष कृतीत उतरविणे आवश्यक आहे.

# शिरूर-बेल्हे महामार्गाचे कामास विलंब का?

**आ. दातेंचे तातडीने खुलासा करण्याच्या सूचना**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातून जाणाऱ्या शिरूर-बेल्हे राष्ट्रीय महामार्ग (एन. एच.-७६१) चे काम सध्या अत्यंत संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर आमदार काशिनाथ दाते सर यांनी राष्ट्रीय महामार्ग विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना पत्र देत कामाच्या संथ गतीबाबत तातडीने माहिती मागविली असून, रखडलेल्या कामाला गती देण्याच्या सूचना केल्या आहेत.



सदर राष्ट्रीय महामार्गाचे काम वेळेत आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण होणे आवश्यक असताना प्रत्यक्षात कामाची गती अत्यंत कमी असल्याने वाहनचालक, प्रवासी तसेच महामार्गालगतच्या गावांमधील नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. कामामुळे वाहतूक कोंडी, धुळीचा त्रास आणि दैनंदिन प्रवासात अडथळे निर्माण होत असल्याच्या अनेक तक्रारी आमदार दाते यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर आमदार दाते सर यांनी संबंधित विभागाकडे काम संथ गतीने सुरू असण्याची नेमकी कारणे कोणती, काम पूर्ण करण्यासाठी कोणत्या प्रशासकीय अथवा तांत्रिक अडचणी येत आहेत, कामाची सद्यस्थिती काय आहे आणि काम पूर्ण होण्याची अपेक्षित कालमर्यादा किती आहे, याबाबतची सविस्तर माहिती तातडीने त्यांच्या कार्यालयास उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे.

तसेच, नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन शिरूर-बेल्हे राष्ट्रीय महामार्गाच्या कामाला तातडीने गती देऊन आवश्यक त्या उपाययोजना करण्यात याव्यात, अशी स्पष्ट भूमिका आमदार काशिनाथ दाते सरांनी घेतली आहे. दरम्यान, या पत्राची प्रत राष्ट्रीय महामार्ग उपविभाग, नारायणगाव येथील उपविभागीय अभियंत्यांनाही देण्यात आली आहे. त्यामुळे आता संबंधित विभागाकडून कामाच्या विलंबाची कारणे आणि पुढील कार्यवाहीबाबत काय माहिती दिली जाते, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# माजी आमदार चंद्रकांत घोडके यांचे निधन

**पैठणच्या राजकीय, सामाजिक व सहकार क्षेत्रावर शोककळा; वयाच्या ८२व्या वर्षी अखेरचा श्वास**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरदचंद्र पवार यांचे निकटवर्तीय आणि पैठणचे माजी आमदार चंद्रकांत सोनाजीराव घोडके यांचे सोमवारी (दि. ५ ऑक्टोबर) दुपारी २ वाजता छत्रपती संभाजीनगर येथील बजाज हॉस्पिटलमध्ये दीर्घ आजाराने निधन झाले. ते ८२ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने पैठण तालुक्यातील राजकीय, सामाजिक तसेच सहकार क्षेत्रावर शोककळा पसरली आहे.



घोडके यांनी पैठण विधानसभा मतदारसंघाचे १९८५ ते १९९० या कालावधीत आमदार म्हणून प्रतिनिधित्व केले. आमदारकीच्या कार्यकाळात त्यांनी पैठण येथील शासकीय रुग्णालय, आयटीआय, संत ज्ञानेश्वर उद्यानाची उभारणी, बसस्थानक तसेच ब्रह्मगव्हाण जलसिंचन योजनेच्या पहिल्या टप्प्यातील कामांसाठी पाठपुरावा केला.

तालुक्यातील विहामांडवा येथील रेणुकादेवी शरदचंद्र साखर कारखान्याच्या स्थापनेतही त्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर मंगळवारी (दि. ६ ऑक्टोबर) सकाळी ११ वाजता सिद्धेश्वर स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या निधनाने पैठणच्या राजकीय व सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# ज्येष्ठ कवयित्री हेमलता गीते यांचा 'भारत गौरव श्री' पुरस्काराने सन्मान

**साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल; नवी मुंबईत अभिनेत्री आशा ज्ञाते यांच्या हस्ते गौरव**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** येथील ज्येष्ठ कवयित्री तथा माजी प्राचार्या हेमलता प्रदीप गीते यांच्या साहित्य क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत नवी मुंबई येथील कला साधना सामाजिक संस्थेच्या वतीने त्यांना 'भारत गौरव श्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कामोठे, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरस्कार प्रदान सोहळ्यात अभिनेत्री आशा ज्ञाते यांच्या हस्ते हेमलता गीते यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

यावेळी माजी प्राचार्य डॉ. रत्नाकर अहिरे, प्रसिद्ध जादूगार सतीश देशमुख, कला साधना सामाजिक संस्थेच्या अध्यक्ष मेघा महाजन, श्रीराम महाजन यांच्यासह साहित्य, कला व सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

हेमलता गीते या मराठी साहित्यविश्वात संवेदनशील, अभ्यासू आणि प्रभावी कवयित्री म्हणून परिचित आहेत. आपल्या लेखणीतून विविध सामाजिक, मानवी



आणि भावनिक विषयांना त्यांनी सातत्याने अभिव्यक्ती दिली आहे. त्यांच्या कवितांमध्ये संवेदनशीलता, सामाजिक जाणिवा आणि जीवनानुभवांचे प्रतिबिंब दिसून येते. कविता लिहिण्याबरोबरच त्या प्रभावी काव्यवाचक म्हणूनही रसिकांमध्ये विशेष परिचित आहेत.

उत्कृष्ट काव्यलेखन, प्रभावी काव्यसादरीकरण आणि ललित साहित्य निर्मिती या क्षेत्रांमध्ये हेमलता गीते यांनी केलेल्या भरीव कार्याची विविध संस्थांनी दखल घेतली आहे. त्यांच्या साहित्यिक कारकिर्दीत आजवर सुमारे दीडशेहून अधिक पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले आहेत. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या प्रदीर्घ आणि उल्लेखनीय योगदानामुळे त्यांनी मराठी साहित्यविश्वात स्वतंत्र स्थान निर्माण केले आहे. दिल्ली येथील दलित साहित्य अकादमीचा प्रतिष्ठेचा 'वीरांगना सावित्रीबाई फुले फेलोशिप अवॉर्ड' यासह विविध मानाचे पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत. काव्यलेखनासोबतच साहित्यवाचन, काव्यसादरीकरण आणि ललित लेखनाच्या माध्यमातून त्यांनी साहित्य रसिकांशी सातत्याने संवाद साधला आहे.

शैक्षणिक क्षेत्रातही प्राचार्या म्हणून कार्य करताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान दिले. शिक्षण आणि साहित्य अशा दोन्ही क्षेत्रांमध्ये त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यिक कार्याचा गौरव करणारा 'भारत गौरव श्री' पुरस्कार हा त्यांच्या प्रदीर्घ साहित्यसेवेचा सन्मान म्हणून प्रदान करण्यात आला आहे. या सन्मानाबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# 'कौन बनेगा कर्मा विजेता?'मध्ये कुशभू मुथाने पटकावले एक लाखांचे बक्षीस

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** कर्म विषयाच्या अभ्यासासाठी अर्हम विज्जा' टीमच्या वतीने 'कौन बनेगा करोडपती'च्या धर्तीवर 'कौन बनेगा कर्मा विजेता?' या अनोख्या गेम शोचे आयोजन करण्यात आले. 'सीक्रेट ऑफ कर्मा' अंतर्गत समर्पण चातुर्मास या उपक्रमात झालेल्या या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या स्पर्धेत अहिल्यानगरच्याखुशबू मुथा हिने उत्कृष्ट कामगिरी करत एक लाख रुपयांचे कॅश प्राईज पटकावले. सोनल गांधी हिने पाच हजार रुपयांचे पारितोषिक मिळविले.

कर्म विषयाच्या स्पर्धा साठी विशेष अभ्यासक्रम देण्यात आला होता. त्यावर आधारित प्रश्नांच्या माध्यमातून 'कौन बनेगा कर्मा विजेता?' हा गेम शो रंगला. कार्यक्रमात या फेरीद्वारे स्पर्धकांची निवड करण्यात आली. त्यानंतर विविध फेऱ्यांमध्ये प्रश्न विचारण्यात आले. पाच राऊंडमध्ये एकूण १०० विजेत्यांना गणपती फॅमिली शॉप तसेच परंपरा हॉटेलचे गिफ्ट व्हाउचर देऊन गौरविण्यात आले.



कार्यक्रमादरम्यानप्रेक्षक मधूनही मध्येच प्रश्न विचारण्यात आले. या प्रश्नांची योग्य उत्तरे देणाऱ्या प्रेक्षकांनाही बक्षिसे देण्यात आली. त्यामुळे स्पर्धेचा उत्साह आणखी वाढला आणि उपस्थित प्रेक्षकांनीही मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला.

या संपूर्ण उपक्रमासाठी फाल्गुनी मेहेर, पूनम भंडारी आणि सुरूची गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे व नगर टीमने दोन महिन्यांहून अधिक काळ अथक परिश्रम घेतले. तसेच समर्पण चातुर्मास समिति चे आदेश चंगेडिया यांचे विशेष मार्गदर्शन या उपक्रमाला लाभले.कार्यक्रमाला पुष्पा स्टील, धनश्री फाउंडेशन, सुनीता गुगळे आणि अर्हम विज्जा यांचे विशेष प्रायोजकत्व लाभले. कार्यक्रमासाठी मनीषा बोगावत व अनिता सेठिया प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.

यावेळी समर्पण चातुर्मास समिति चे अध्यक्ष अशोक बाबूशेठ बोरा,तसेच ट्रस्टी विजय गुगळे, राजूशेठ बोरा, विलास कटारिया, सचिन देसर्डाआदी मान्यवर उपस्थित होते. तसेच मागील वर्षाची कर्मा विजेती साची धाडिवाल हिचीही विशेष उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले. कर्म विषयाचा अभ्यास अधिक मनोरंजक आणि सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या अनोख्या गेम शोला मिळालेला प्रतिसाद उल्लेखनीय ठरला.

# गुरुदर्शन संघ यात्रा भक्तिभावात संपन्न

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** श्री वर्धमान जैन श्रावक संघ व गुरुदेव युवा मंच, केडगाव, अहिल्यानगर यांच्या वतीने वर्ष ३ रे एकदिवसीय गुरुदर्शन संघ यात्रेचे आयोजन करण्यात आले. श्रावक संघाचे अध्यक्ष श्री. पन्नालालजी बोकरीया यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित ही यात्रा अत्यंत श्रद्धा, भक्ती आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. संघयात्रेत श्रावक संघाचे पदाधिकारी तसेच गुरुदेव युवा मंच चे सदस्य व महिला मंडळ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



यात्रेदरम्यान बार्शी येथे महासाध्वी परमपूज्य प्रणवदर्शनाजी म.सा. व साध्वी परमपूज्य ईशदर्शनाजी म.सा. आदी ठाणा यांचे मंगल दर्शन घेण्यात आले. त्यानंतर कुरुडवाडी येथे महासाध्वी परमपूज्य श्री. सुनंदाजी म.सा. आदी ठाणा यांचे दर्शन घेण्याचा लाभ भाविकांना मिळाला. तसेच दौंड येथे महासाध्वी श्री. दिव्यदर्शनाजी म.सा. व साध्वी परमपूज्य पुनीतदर्शनाजी म.सा. आदी ठाणा यांचे मंगल दर्शन घेऊन भाविकांनी आशीर्वाद व सान्निध्याचा लाभ घेतला.

या संपूर्ण यात्रेदरम्यान सहभागी भाविक कु. नेहा बाफना यांच्या सुमधुर व भक्तिमय वाणीने सर्व ठिकाणी भक्तिगीते सादर करण्यात आली. त्यांच्या सुमधुर गायनामुळे यात्रेतील वातावरण अधिकच भक्तिमय झाले. गुरुदर्शन, भक्तिगीतांचा स्वर आणि साध्वीजी भगवंतांचे आशीर्वाद यामुळे संघ यात्रेचा आध्यात्मिक आनंद द्विगुणित झाला.

धर्म, संस्कार आणि समाजातील एकता दृढ करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेली ही गुरुदर्शन संघ यात्रा सहभागी भाविकांसाठी आध्यात्मिक समाधान देणारी व अविस्मरणीय ठरली. अशा धार्मिक उपक्रमांमुळे समाजातील परस्पर स्नेह, बंधुभाव आणि एकतेची भावना अधिक दृढ होण्यास मदत होते.

एकजूट हीच आपली ताकद, संघटन हीच आपली ओळख आणि समाजहित हेच आमचे ध्येय!
सर्वांना सोबत घेऊन एक मजबूत, सक्षम आणि एकसंघ समाज बनवणे हेच आमचे लक्ष आहे. असे प्रतिपादन श्री. रोशन चोरडीया यांनी केले

संघ यात्रेत सहभागी झालेल्या सर्व धर्मप्रेमी, श्रावक - श्राविकांचे श्री वर्धमान जैन श्रावक संघाच्या वतीने मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

# तवले नगरात विविध विकासकामांचे भूमिपूजन

**रस्ता कॉंक्रिटीकरण, ड्रेनेज लाईन व सुशोभीकरणाच्या कामांना प्रारंभ; नित्यसेवा ते अभियंता कॉलनी डीपी रस्त्याच्या भूसंपादनाची मागणी**




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मनपा प्रभाग क्रमांक दोनमधील तवले नगर येथे नगरसेवक महेश तवले यांच्या पाठपुराव्यातून तसेच आमदार संग्राम जगताप व माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या प्रयत्नातून रस्ता कॉंक्रिटीकरण, ड्रेनेज लाईन तसेच व्यायामशाळेसमोरील सुशोभीकरणाच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले

यावेळी नगरसेवक महेश तवले, नगरसेवक निखिल वारे, बाळासाहेब पवार, सुनील त्रिंबके, विशाल नाकाडे, संपत नलवडे, राहुल सांगळे, कांता अष्टेकर, अक्षय कराळे, ॲड. रणजीत गोरे आदी सह प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगर शहराचा पुढील वीस वर्षांचा विचार करून सर्वच क्षेत्रांमध्ये नियोजनबद्ध विकासकामे सुरू आहेत. कॉलनीतील रस्त्यांपासून थेट डीपी रस्त्यांपर्यंत कॉंक्रिटीकरणाची कामे मार्गी लावली जात आहेत. पूर्वी डांबरी रस्ते एका पावसाळ्यात खराब होत होते; मात्र आता नियोजनबद्ध व कायमस्वरूपी विकासकामे करण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे नागरिकांकडूनही या विकासकामांचे स्वागत होत आहे.

राज्य शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करून शहरातील शेवटच्या घटकापर्यंत निधी घेऊन जाण्याचे काम केले जात आहे. शहरात शासनाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर विकासकामे सुरू असून, ही कामे जनतेच्या करातून होत असतात. त्यामुळे विकासकामांमध्ये नागरिकांचे सहकार्यही तितकेच महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले.

कापड बाजारातील कॉंक्रिटीकरणाच्या रस्त्याचे काम पूर्ण झाले असून, याच मार्गावरून गणेश विसर्जनाची मिरवणूकही पार पडली. शहरात विकासकामे करताना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. त्यामुळे नागरिकांनी विकासकामांना सहकार्य करावे, असे आवाहन आमदार जगताप यांनी केले.

नगरसेवक महेश तवले यांनी नित्यसेवा सोसायटी ते अभियंता कॉलनीपर्यंतचा डीपी रस्ता खुला करून त्याचे कॉंक्रिटीकरण करण्याची मागणी केली आहे. हे कामही लवकरच मार्गी लावून नागरिकांना जवळचा दळणवळणाचा मार्ग उपलब्ध करून देण्यात येईल, असे जगताप यांनी सांगितले.

तपोवन रस्त्यावरील लक्ष्मी नगर भागातील भूसंपादनाचा प्रश्न यापूर्वी प्रलंबित होता. तोही मार्गी लावण्यात आला असून, त्यामुळे तपोवन रोडला मोठी बाजारपेठ निर्माण झाली आणि नागरिकांना दळणवळणाचा मार्ग उपलब्ध झाला. महापालिकेत विकासाचे व्हिजन असणारी व चांगल्या विचारांची टीम नागरिकांनी निवडून दिली आहे. नगरसेवक महेश तवले यांच्या पाठपुराव्यातून तवले नगर परिसरात विविध विकासकामे मार्गी लागत असल्याचे त्यांनी सांगितले.

समाजात वावरताना आपल्या शहराप्रती प्रत्येक नागरिकाची काही ना काही जबाबदारी आहे. भविष्यात तापमानवाढीचा मोठा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाची लोकचळवळ उभी करणे गरजेचे आहे. तसेच परिसर व रस्ते स्वच्छ ठेवण्यासाठी कचरा घंटागाडीतच टाकावा, असे आवाहनही आमदार संग्राम जगताप यांनी केले.

# अहिल्यानगरच्या डॉ. सचिन उदमले यांचा राज्यस्तरीय गौरव

**प्रेसिडेंट अप्रिसिएशन अवॉर्डने सन्मान । राज्यातअहिल्यानगरचा डंका अहिल्यानगर भूलतज्ज्ञ शाखेला बेस्ट सिटी ब्रांच पुरस्कार**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय वाटचाल करणारे अहिल्यानगरचे भूलतज्ज्ञ व अतिदक्षता तज्ज्ञ डॉ. सचिन उदमले यांना महाराष्ट्रातील भूलतज्ज्ञांच्या राज्यस्तरीय संघटनेच्या सॅम्सकॉन–२०२६ परिषदेत अध्यक्षांचा प्रशंसापर राज्यस्तरीय पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तसेच त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या अहिल्यानगर च्या भूलतज्ञ शाखेला मध्यम गटात राज्यात तृतीय क्रमांकाचा सर्वोत्कृष्ट शहर शाखा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला. या दुहेरी सन्मानामुळे अहिल्यानगरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

महाराष्ट्रातील भूलतज्ज्ञांची राज्यस्तरीय परिषद सॅम्सकॉन–२०२६दि. २, ३ व ४ ऑक्टोबर रोजी पाचगणी येथे सातारा जिल्हा संघटनेच्या वतीने आयोजित करण्यात आली होती. या परिषदेला राज्यभरातून ८०० हून अधिक भूलतज्ज्ञ उपस्थित होते. वर्षभरातील शैक्षणिक उपक्रम, कार्यशाळा, जनजागृती आणि सामाजिक उपक्रमांच्या आधारे राज्यातील विविध शाखांमधून अहिल्यानगर शाखेची मध्यम गटात तृतीय क्रमांकासाठी निवड करण्यात आली. डॉ. सचिन उदमले यांना अध्यक्षांचा विशेष प्रशंसापर पुरस्कार देऊन गौरवण्यात आले. संघटनेसाठी असाधारण योगदान, निःस्वार्थ सेवा, सामाजिक उपक्रम, हृदय–फुफ्फुस पुनरुज्जीवनाचे (सीपीआर) प्रशिक्षण, जनजागृती तसेच रेडिओ आणि वृत्तपत्रांच्या माध्यमातून रुग्ण व डॉक्टर यांच्यातील संवाद वाढविण्यासाठी केलेल्या कार्याची दखल




घेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश भोसले, उपाध्यक्ष डॉ. विकास कर्ने आणि सचिव डॉ. शितल दलाल यांच्या हस्ते राज्यभरातील भूलतज्ज्ञांच्या उपस्थितीत डॉ. उदमले यांचा गौरव करण्यात आला.

मुंबईवरील २६/११ दहशतवादी हल्ल्याच्या काळात जखमींवर सलग तीन दिवस रात्रंदिवस उपचार करताना शस्त्रक्रियांसाठी भूल देण्याची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांनी पार पाडली. गेल्या १७ वर्षांपासून ते अहिल्यानगरमध्ये भूलतज्ज्ञ व अतिदक्षता तज्ज्ञ म्हणून सेवा देत आहेत. कोरोना महामारीच्या काळातही स्वतःच्या जीवाची पर्वा न करता अतिदक्षता विभागात अहोरात्र सेवा बजावत त्यांनी अनेक रुग्णांच्या उपचारात महत्त्वाची भूमिका निभावली.

२०२४ ते २०२६ या कालावधीत 'एएसए अहिल्यानगर'चे सचिव म्हणून डॉ. उदमले यांनी जबाबदारी सांभाळली. त्यांच्या नेतृत्वाखाली शाखेच्या वतीने विविध शैक्षणिक, सामाजिक आणि जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात आले. या कार्याची दखल घेत अहिल्यानगर शाखेला राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला.

पुरस्काराबद्दल भावना व्यक्त करताना डॉ. उदमले म्हणाले हा पुरस्कार केवळ माझा नाही तर माझ्या शाखेतील प्रत्येक सदस्याच्या मेहनतीचा आणि त्यांनी माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाचा परिणाम आहे. मला सेवा करण्याची संधी मिळाली म्हणून मी सर्वांचे सहकार्याने इथपर्यंत पोहोचू शकलो. भविष्यातही रुग्णसेवा आणि सामाजिक जनजागृतीचे कार्य अधिक जोमाने सुरू ठेवण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला.

मार्गदर्शक डॉ. श्रीकांत मोने, एमएसआयएसएचे माजी अध्यक्ष डॉ. मिलिंद पोळ, एएसए अहिल्यानगरचे अध्यक्ष डॉ. राहुल एरंडे डॉ.नीलिमा उदमले, हृदयरोग तज्ञ डॉ. बापूसाहेब कांडेकर आयएमएचे अध्यक्ष डॉ. धनंजय कुलकर्णी माजी अध्यक्ष डॉ. चंद्रवदन मिश्रा, डॉ. संगीता कुलकर्णी.तसेच सर्व सभासदांनी उदमले यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसशुभेच्छा दिल्या . ग्रामीण भागातून वैद्यकीय क्षेत्रात यशस्वी वाटचाल करत राज्यस्तरीय सन्मान मिळविणाऱ्या डॉ. उदमले यांचा हा प्रवास ग्रामीण भागातील युवा डॉक्टरांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# कायनेटिक चौकातील रेल्वे पुलावरील तुटलेले सुरक्षा कठडे तातडीने बसवा

**सणासुदीच्या काळात वाढणार वाहतुकीची वर्दळ; राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसची सार्वजनिक बांधकाम विभागाकडे मागणी**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील कायनेटिक चौक परिसरातून केडगावच्या दिशेने जाणाऱ्या पुणे महामार्गावरील रेल्वे पुलावरील सुरक्षा कठडा पडलेला व तुटलेला असून, त्यामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. या ठिकाणी दुर्घटना घडून जीवितहानी होण्याची शक्यता लक्षात घेता तुटलेला कठडा तातडीने दुरुस्त करून नवीन व मजबूत सुरक्षा कठडा बसविण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष सुरज कोतकर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, कायनेटिक चौक परिसरातून केडगावच्या दिशेने जाणाऱ्या नगर–पुणे मार्गावरील रेल्वे पुलावर एक सुरक्षा कठडा पडलेला अथवा तुटलेला आहे. या पुलावरून



दररोज मोठ्या प्रमाणात नागरिक, दुचाकीस्वार व वाहनचालकांची ये–जा सुरू असते. त्यामुळे सुरक्षा कठडा तुटलेल्या ठिकाणी गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता असून, नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

सध्या नवरात्र व दसरा हे सण सुरू असून, केडगाव येथील श्री रेणुका माता मंदिरात दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविक या मार्गाने ये–जा करतात. त्याचप्रमाणे आगामी दिवाळीच्या काळात नेमाने इस्टेट परिसरात फटाका बाजार भरत असल्याने या मार्गावरील नागरिकांची तसेच वाहनांची वर्दळ आणखी वाढण्याची शक्यता आहे.

अशा परिस्थितीत रेल्वे पुलावरील सुरक्षा कठडा पडलेला असणे अत्यंत धोकादायक आहे. एखाद्या नागरिकाचा अथवा वाहनचालकाचा तोल जाऊन तो पुलावरून खाली पडल्यास गंभीर दुर्घटना होऊन जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे कोणतीही दुर्घटना घडण्याची वाट न पाहता सार्वजनिक बांधकाम विभागाने या बाबीची तातडीने दखल घेणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

प्रशासनाने तातडीने पडलेला अथवा तुटलेला सुरक्षा कठडा दुरुस्त करून त्या ठिकाणी नवीन मजबूत कठडा बसवावा. दुरुस्तीचे काम पूर्ण होईपर्यंत संबंधित ठिकाणी बॅरिकेडिंग करून आवश्यक सुरक्षा व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

तसेच पुलाची संपूर्ण पाहणी करून इतर सुरक्षा कठडे व सुरक्षा संरचना सुस्थितीत आहेत की नाही, याची तपासणी करावी. सणासुदीच्या काळात या मार्गावर वाढणारी गर्दी लक्षात घेऊन आवश्यक त्या सुरक्षात्मक उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. नागरिकांच्या जीविताशी संबंधित ही गंभीर बाब असल्याने प्रशासनाने कोणतीही दुर्घटना घडण्याची वाट न पाहता तातडीने कार्यवाही करावी, अशी विनंती राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आली आहे. यावेळी कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव यांनी शिष्टमंडळास सांगितले की रेल्वे पुलावरील तुटलेले कठडे तातडीने बसविण्यात येतील असे आश्वासन यावेळी दिले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये शुक्रवारी मोफत दंतरोग तपासणी व जन्मजात दुभंगलेले ओठ, टाळू शस्त्रक्रिया शिबीर

**सवलतीच्या विविध अत्याधुनिक दंतोपचार सुविधा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** जैन सोशल फेडरेशनद्वारा संचालित आनंदऋषिजी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटर येथे शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत मोफत दंतरोग तपासणी आणि जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तज्ज्ञ डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखाली हे तपासणी शिबिर होईल. स्माईल ट्रेन प्रकल्पांतर्गत जन्मजात दुभंगलेले ओठ व टाळू शस्त्रक्रिया मोफत केल्या जातील.

आनंदऋषीजी हॉस्पिटल येथे अद्ययावत दंतोपचार सुविधा उपलब्ध आहेत. शिबिरात पूर्ण वेळ दंतरोग तज्ज्ञ डॉ. अर्पणा पवार (सकाळी १० ते ४), डॉ. प्राची गांधी (सायं. ५ ते ८), ऑर्थोडेंटिस्ट डॉ. कोमल ठाणगे, डॉ. अश्विनी बालगुडे,



डॉ. राजलक्ष्मी राय, पिडियाट्रीक डेंटिस्ट डॉ. प्रणव डुंगरवाल, डॉ. तृप्ती डुंगरवाल, पेरिओ डेंटिस्ट डॉ. सुप्रिया कवडे, एण्डो डेंटिस्ट डॉ. पूजा गायकवाड, प्रोस्थो डेंटिस्ट डॉ. पारितोष वारे, ओरल सर्जन डॉ. स्वराज ठोले, मॅक्सिलोफेशिअल सर्जन डॉ. मृदुला मुळे रुग्ण तपासणी व उपचार मार्गदर्शन करतील. शिबिरात मेटल कॅप, सिरॅमिक कॅप, रूट कॅनल, दात साफ करणे, दातांची कवळी बसवणे, दातांमध्ये सिमेंट भरणे,इम्प्लांट इत्यादी उपचार सवलतीच्या दरात केले जातील. औषध खर्च वेगळा असेल.

आनंदऋषीजी हॉस्पिटीलमध्ये डिजिटल एक्स रे २५० रूपये, सोनोग्राफी कलर प्रिंट व रिपोर्टसह ९५० रूपये, सिटी स्कॅन १२५० रूपये, एम. आर. आय. २५०० रूपये रुपयात उपलब्ध आहे. २४ तास आनंदऋषीजी ब्लड सेवा. हायटेक पॅथोलॉजी लॅब, ३५ अत्याधुनिक डायलिसिस मशीनद्वारे उपचार सेवा उपलब्ध आहेत. शिबिराचा जास्तीत जास्त रूग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी संपर्क: ०२४१– २३२०४७३/ ७४/७५ / ७६.

# दोन वर्षांचा 'रस्ता बंद'चा तिढा अखेर सुटला!

**महसूल–पोलिस प्रशासनाच्या संयुक्त कारवाईत दिघी शिवारातील शेतरस्ता खुला; पाच पंचांच्या साक्षीने पंचनामा, स्वाक्षऱ्यांसह कार्यवाही पूर्ण**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा–** नेवासा तालुक्यातील दिघी शिवारात गेल्या दोन वर्षांपासून बंद असलेल्या शेतरस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. भेंडेसलाबतपूर रस्त्यापासून गट क्रमांक १५५/१/१ मधील रावसाहेब कडू यांच्या शेताकडे जाणारा शेतरस्ता महसूल व पोलिस प्रशासनाच्या प्रत्यक्ष उपस्थितीत खुला करण्यात आला. त्यामुळे या मार्गावरून शेतात ये–जा करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. गेल्या दोन वर्षांपासून रस्ता बंद असल्यामुळे संबंधित शेतकऱ्यांना शेतात जाण्या–येण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागत होता. याप्रश्नी प्रशासनाकडे करण्यात आलेल्या पाठपुराव्यानंतर तहसीलदार यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने नियमानुसार कार्यवाही केली. रस्ता खुला करण्याच्या प्रत्यक्ष कार्यवाहीवेळी सर्कल अधिकारी श्रीमती मनाळ मॅडम, श्रीमती साळवे मॅडम, ग्राम महसूल अधिकारी तसेच हवालदार वाघमोडे दादा व त्यांचे सहकारी उपस्थित होते. पोलिस बंदोबस्तात महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून रस्ता खुला करण्याची कार्यवाही पूर्ण केली.

पाच पंचांच्या उपस्थितीत पंचनामा; स्वाक्षऱ्यांसह कार्यवाहीची नोंद

या कार्यवाहीतील महत्त्वाची बाब म्हणजे गावातील पाच पंचांच्या समक्ष सदर शेतरस्ता खुला करण्यात आला. प्रत्यक्ष कार्यवाहीची नोंद पंचनाम्यामध्ये करण्यात आली असून, उपस्थित पंचांनी पंचनाम्यावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यामुळे रस्ता खुला करण्याच्या प्रत्यक्ष कार्यवाहीची अधिकृत नोंद संबंधित कागदपत्रांमध्ये राहणार आहे. यावेळी रस्त्यालगतचे संबंधित शेतकरीही मोठ्या संख्येने उपस्थित होते. महसूल अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, पोलिस कर्मचारी, पंच आणि संबंधित शेतकऱ्यांच्या उपस्थितीत ही कार्यवाही पार पडली.

**प्रशासनाच्या कार्यवाहीमुळे शेतकऱ्यांना दिलासा**

दोन वर्षांपासून रस्ता बंद असल्याने शेतीची मशागत, शेतमालाची वाहतूक तसेच दैनंदिन शेतीकामांसाठी शेतकऱ्यांना अडचणी येत होत्या. अखेर प्रशासनाच्या हस्तक्षेपामुळे हा मार्ग खुला झाल्याने संबंधित शेतकऱ्यांना आपल्या शेतजमिनीपर्यंत ये–जा करण्यासाठी मार्ग उपलब्ध झाला आहे. गट क्रमांक १५५/१/१ संदर्भातील या कार्यवाहीदरम्यान पंचनामा करण्यात आल्याने आणि पंचांच्या स्वाक्षऱ्यांसह कार्यवाही नोंदविण्यात आल्याने भविष्यात या मार्गाबाबत कोणताही वाद किंवा अडथळा निर्माण झाल्यास संबंधित महसूल अभिलेख व पंचनामा तपासण्यासाठी उपलब्ध राहणार आहे.महसूल व पोलिस प्रशासनाच्या समन्वयातून झालेल्या या कार्यवाहीमुळे दीर्घकाळ प्रलंबित असलेला शेतरस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला. दोन वर्षांपासून बंद असलेला मार्ग प्रशासनाच्या उपस्थितीत पुन्हा खुला झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

(पान १ वरून)

## जिल्हा बँकेच्या उमेदवारी अर्जांवर आक्षेपांचा पाऊस; उद्या चित्र स्पष्ट

उमेदवारांना दुपारी तीन वाजेपर्यंत मुदत देण्यात आली होती. त्यानंतर प्राप्त हरकतींवर सुनावणी घेण्यात आली. ही प्रक्रिया सायंकाळपर्यंत सुरू होती. मात्र, अर्ज वैध की अवैध याबाबतचा अंतिम निर्णय बुधवारी (ता. ७) जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीचे नेमके चित्र उद्याच स्पष्ट होणार आहे. अनेक तालुक्यांतील अर्जांची सुनावणीनेवासा, संगमनेर, शेवगाव, श्रीरामपूर, पाथर्डी, नगर तालुका, जामखेड, राहाता, राहुरी, कोपरगाव, पारनेर, अकोले, कर्जत आणि श्रीगोंदा या तालुक्यांतील उमेदवारी अर्जांची छाननी व हरकतींवरील सुनावणी करण्यात आली. दरम्यान, प्रमुख राजकीय नेत्यांच्या अर्जांवर आक्षेप घेण्यात आल्याने निवडणूक कार्यालयाबाहेर उमेदवार आणि कार्यकर्त्यांची मोठी गर्दी झाली होती. संभाव्य तणावाची शक्यता लक्षात घेऊन परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आता अर्ज छाननीचा अंतिम निर्णय बुधवारी जाहीर होणार असून त्यानंतर जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील खरे चित्र समोर येणार आहे.

## विकसित भारत संकल्प सभा आणि सेवा ज्योती यात्रेचे शहरात आयोजन

संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन भाजपाचे अहिल्यानगर दक्षिण जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, उत्तर जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर व शहर जिल्हाअध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले आहे.

## पारनेरमधून विक्रमी अर्ज

**माघारीच्या दिवशी चित्र स्पष्ट होणार** उमेदवारी अर्ज दाखल झाले असले तरी अंतिम लढतीचे चित्र अद्याप स्पष्ट झालेले नाही. अर्जांची छाननी आणि त्यानंतरची माघारीची प्रक्रिया महत्त्वाची ठरणार आहे. माघारीच्या अंतिम दिवशी खासदार लंके यांच्यासमोर प्रत्यक्षात कोण उमेदवार राहणार, हे स्पष्ट होईल. त्यामुळे तोपर्यंत महायुतीतील तसेच विविध राजकीय गटांतील चर्चांना वेग येण्याची शक्यता आहे.

गायकवाड यांचे तीन मतदारसंघांत पर्याय खुले

गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत बिगरशेती मतदारसंघातून विजयी झालेले प्रशांत सबाजीराव गायकवाड यांनी यंदाही त्याच मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. मागील निवडणुकीत श्रीगोंद्याचे दत्तात्रेय पानसरे यांनी त्यांना तगडी लढत दिली होती. यंदा गायकवाड यांनी बिगरशेती मतदारसंघाबरोबरच इतर मागासवर्गीय प्रतिनिधी मतदारसंघातूनही अर्ज दाखल केला आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या पत्नी सोनल गायकवाड यांचा महिला राखीव मतदारसंघातून अर्ज दाखल करण्यात आला आहे. त्यामुळे एका कुटुंबाने तीन मतदारसंघांत पर्याय खुले ठेवले आहेत.

कोणाला पाठबळ, कुणाची माघार ?

पारनेर तालुका सेवा संस्था मतदारसंघात चार उमेदवारांचे तब्बल दहा अर्ज दाखल झाले आहेत. बिगरशेती मतदारसंघात चार उमेदवारांचे चार अर्ज, महिला राखीव मतदारसंघात दोन उमेदवारांचे दोन अर्ज, इतर मागासवर्गीय मतदारसंघात एका उमेदवाराचा एक अर्ज, तर विशेष मागासवर्ग प्रवर्ग मतदारसंघात एका उमेदवाराचा एक अर्ज दाखल झाला आहे. एकीकडे जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध करण्यासाठी वरिष्ठ पातळीवर प्रयत्न सुरू असताना पारनेर तालुक्यातून बँकेच्या इतिहासात प्रथमच एवढ्या मोठ्या संख्येने उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. त्यामुळे या अर्जांपैकी कोण माघार घेणार, कोणाला पक्षीय पाठबळ मिळणार आणि अंतिमतः कोण कोणाच्या विरोधात मैदानात उतरणार, यावर पुढील राजकीय गणिते अवलंबून राहणार आहेत. परिणामी जिल्हा बँकेच्या निवडणुकीपेक्षा पारनेरमधील उमेदवारीचे राजकारण सध्या अधिक चर्चेचा विषय ठरले आहे.

## रामकृष्णाच्या विद्यार्थ्यांचे बहारदार राज्याभिषेक सादरीकरण

मुग्धा देवकर यांनी केले. श्रीराम कृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सहसचिव श्री बजरंग दरक यांनी या कार्यक्रमासाठी विशेष मेहनत घेतली. श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टने घेतलेल्या या श्री छत्रपती शिवाजी महाराज चरित्र कथा कार्यक्रमाचे सूत्रसंचालनाचे काम सौ मुग्धा देवकर यांनी उत्तमरीत्या संभाळले. श्री रामकृष्ण सेवा ट्रस्टच्या अध्यक्षांसह सर्व सभासदांनी कार्यक्रमात सहभागी झालेल्या शाळेच्या विद्यार्थ्यांसह शिक्षकांचे मनापासून कौतुक केले. श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे अध्यक्ष श्री. श्री गोपाल धूत ,उपाध्यक्ष व शाळा समितीचे चेअरमन श्री. नंदकुमार झंवर ,उपाध्यक्ष श्री. मोहनलाल मानधना व श्री. राजेश झंवर तसेच सचिव डॉक्टर शरद कोलते सहसचिव श्री बजरंग दरक व सर्व पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे उत्तम कामाबद्दल अभिनंदन केले.

## नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर केडगाव देवी परिसराची महापौर, आयुक्तांकडून पाहणी

गैरसोय होऊ नये, यासाठी महापालिकेच्या माध्यमातून विविध सुविधा व उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने आज परिसराची पाहणी करून संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

मोहिनीनगर येथे रेल्वे भुयारी मार्ग तयार झाला असून, कायनेटिक चौक–दौंड रोडमार्गे केडगाव देवीच्या दर्शनासाठी जाणाऱ्या भाविकांना हा जवळचा मार्ग उपलब्ध झाला आहे. पुणे महामार्गावरून येताना भाविकांना वाहतुकीच्या समस्येला सामोरे जावे लागू शकते. त्यामुळे भाविकांनी कायनेटिक चौक, मोहिनीनगर रेल्वे भुयारी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन महापौर ज्योतीताई गाडे यांनी केले.मनपा आयुक्त यशवंत डांगे यांनी केडगाव देवी परिसरातील विविध कामांचा आढावा घेत प्रशासनाला आवश्यक त्या सूचना दिल्या. नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील स्वच्छता, पाणी, विद्युत व्यवस्था, रस्त्यांचे पॅचिंग, मोकाट कुत्रे व जनावरे तसेच अतिक्रमणांच्या प्रश्नांवर आवश्यक त्या उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या.